DISTRICT & SESSIONS COURT, KOLHAPUR
CIVIL / CRIMINAL CASE FILING FORM

| Case Type | R. C. S. Regular Civil Suit |
|---|---|

APPLICANTS / COMPLAINANT DETAILS

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Name | Bhagyashri Bharat Patil | | | | |
| Father/Mother/Husband | Bharat Jingonda Patil | | | | |
| Address | A/P - Halondi, Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur | | | | |
| Sex | Male | – | Femal | ✓ | Age: 36 |
| Nationality | Indian:- If other Mentioned | | Indian | ✓ | |
| E-Mail Address | ----- | Phone No 8888908850 | | Fax No : – | |
| | | Mobile No 8888908850 | | – | |
| Subject | Specific Relief Act Sec. 31, 34, 37, 38 | | | | |
| Advocate Code | | Advocate Name :- Adv. Bharat Jingonda Patil<br>Mobile No :- 8378932523 | | | |

ACCUSED / OPPONENT DETAILS

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Name | Sunita Mahavir Patil | | | | | | |
| Father/Mother/Husband | Mahavir Annaso Patil | | | | | | |
| Address | Hupri, Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur | | | | | | |
| Sex | Male | – | Female | ✓ | Age: 50 | Cast | Jain |
| Nationality | Indian:- If other Mentioned | Indian | | Occupation;- | Housework | | |
| E-Mail Address | ---- | Phone No – | | | Fax No : – | | |
| | | Mobile No 9673241008 | | | – | | |
| Subject | | | | | | | |
| Advocate Code | ---- | Advocate Name :-<br>Mobile No :- | | | | | |

POLICE STATION DETAILS

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Police Station | | Fir No. | | YEAR | |
| Trail(tick one) | Session | Regular | Summary | | |
| Complaint (tick one) | Police Challan | Private Complaint | | Date of Offence | / /2022 |

LOWER COURT DETAILS

| | | | |
|---|---|---|---|
| Court Name | | | |
| Case No. | | Decision Date :- | / /2022 |

MAIN MATTER DETAILS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Case Type | Bail | Case NO -- | Year– | 2022 |

FOR OFFICE USE ONLY

| | | | |
|---|---|---|---|
| Objection Redrassal Date :- / /2022 | | Objection Compliance Date :- / /2022 | |
| Registration No. | | Registration Date : / /2022 | Listing Date: / /2022 |
| Court Allottes | | - Allocation Date :- / /2022 | |

Presented by
Adv. Bharat J. Patil
[signature]

दैनिक रजिस्टर नं. रे.क.नं. /२०२६

दावा दाखल ता. 05/01/2026

मे.दिवाणी न्यायाधीशसो, वरिष्ठ स्तर, इचलकरंजी ,

यांचे न्यायालयात -------

भाग्यश्री भरत पाटील
व.व.३६, धंदा – घरकाम,
रा.हालोंडी, ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर
} वादी

विरुद्ध

१) सुनिता महावीर पाटील,
व.व.५०, धंदा – घरकाम, रा. ४४९/१, पाटील गल्ली,
पार्श्वनाथ दिगंबर सैतवाल मंदिर जवळ, रत्नदिप तरुण मंडळाशेजारी
हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

२) मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान
व.व.३०, धंदा – घरकाम,
रा. ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, मारुती चौक,
अक्षय मेडिकलसमोर, सांगवडे, ता. करवीर, जि. कोल्हापूर

३) लक्ष्मी महावीर पाटील
व.व.५५, धंदा – घरकाम,
रा. सध्या माळभाग गणेश मंदिर शेजारी,
रांगोळी,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर

४) धनश्री उर्फ स्नेहल राहुल हुन्नरगे,
व.व.३४, धंदा – घरकाम,
रा.हुन्नरगे गल्ली, रांगोळी,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर
} प्रतिवादी

कोर्ट फी FEE COURT Rs.5 FIVE RUPEES 24 SEP 2025

5-1-26
Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

दावा हक्कज्ञापनचा व कायम मनाईचा असलेने कोर्ट फी व कोर्टच्या अधिकाराकरिता दावा रक्कम रुपये २,०००/-


दि.०३/०९/२०२५ रोजीचे वारसा प्रतिज्ञापत्र रद्द होवून मिळणेकरिता दावा हक्कज्ञापनचा व कायम मनाई ताकिदीचा असलेने स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट चे कलम ३१,३४,३७,३८ प्रमाणे दावा

यातील वादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितात की,

१) दावा मिळकतीचे वर्णन :-

प्रतिवादी नं. १ यांनी दि. ०३/०९/२०२५ या रोजी मे. कार्यकारी दंडाधिकारीसो हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचे समोर केलेले वारसा प्रतिज्ञापत्र हे खोटे, चुकीचे, लबाडीचे, अनाधिकाराचे, बनावट, पोकळ, मूलतःच रद्दबातल असलेले, ब्रेकायदेशीर वारसा प्रतिज्ञापत्र म्हणजे "दावा वारसा प्रतिज्ञापत्र रद्द असून वादी व वादीचे वडिलार्जीत मिळकतीवर बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन होणे तसेच सदर खोटे वारसा प्रतिज्ञापत्र याचा अंमल करू नये म्हणून कायम मनाईचा आदेश होवून मिळावा व तसा ठराव व हुकूमनामा होणे या दाव्याचा विषय असून येथून पुढे यास "दावा मिळकत" असे संबोधणेत आले आहे.

२) वादी व प्रतिवादी यांची दावेच्या कारणापूरती वंशावळ खालील प्रमाणे:-




३) वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार महावीर आण्णासो पाटील (मयत) होय. प्र.वा.नं.३ लक्ष्मी या मयत महावीर आण्णासो पाटील यांची प्रथम पत्नी असून लक्ष्मी व महावीर यांचे वैवाहिक संबंधातून भाग्यश्री व धनश्री या मुली तर महावीर यांचे दिव्तीय पत्नी सुनिता यांचेशी बेकायदेशीर संबंधातून मयुरी ही मुलगी अशी अपत्ये आहेत.

महावीर आण्णासो पाटील (मयत) हे वादीचे जनक पिता असून, प्र.वा.नं.३ या वादीच्या जनक आई आहेत. प्र.वा.नं.४ ही वादीची सख्खी बहीण असून प्र.वा.नं.२ ही वादीची सावत्र बहीण आहे. प्र.वा.नं.१ या वादीच्या सावत्र आई आहेत.

४) महावीर आण्णासो पाटील हे दि.२६.०६.२०२५ या रोजी मयत झालेले आहेत. त्यानंतर प्र.वा.नं.१ यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्र.वा.नं.२ यांचे लाभात केलेले मे.

Superintendent
Civil Court Sr. Dn.

कार्यकारी दंडाधिकारीसो हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे समोर केलेले खोटे, चुकीचे, बनावट, रद्दबातल, बेकायदेशीर वारसा प्रतिज्ञापत्र तयार केलेले आहेत.

सदरचे बेकायदेशीर वारसा प्रतिज्ञापत्र रद्द होवून मिळणेसाठी व तसे हक्कज्ञापन व्हावे व तसा ठराव व हुकूमनामा होवून मिळावे. तसेच तथाकथित बेकायदेशीर वारसा प्रतिज्ञापत्र चा अंमल करून प्रतिवादी यांनी अगर तर्फे इसमांनी हस्तांतरण, तबदिली, हरकत करू नये या करिता मागितलेले कायम मनाईची दाद हा सुद्धा दाव्याचा विषय असून येथून पुढे “दावा मिळकत” असे संबोधनेत आले आहे.

सदरचे “दावा मिळकत” यास हक्कज्ञापनाचा व कायम मनाईचा विषय असे संबोधनेत यावे.

५) मयत महावीर आण्णासो पाटील यांची कायदेशीर विवाहित प्रथम पत्नी प्र.वा.नं.३ लक्ष्मी महावीर पाटील यांना वादी भाग्यश्री भरत पाटील व प्र.वा.नं.४ धनश्री उर्फ स्नेहल राहुल हुन्नरगे या दोन मुली आहेत. प्रथम पत्नी प्र.वा.नं.३ लक्ष्मी महावीर पाटील यांचेशी विवाह विच्छेदन (घटस्फोट) न होता म्हणजेच विवाह अस्तीत्वात असताना मयत महावीर आण्णासो पाटील यांनी दुसरा विवाह प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांचेशी बेकायदेशीरपणे विवाह केलेला होता. प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील या मयत महावीर आण्णासो पाटील यांची द्वितीय पत्नी आहेत.

मयत महावीर आण्णासो पाटील यांची द्वितीय पत्नी प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांना प्र.वा.नं.२ मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान ही मुलगी अवैध संबंधामधून (Illicit Relationsship) जन्मलेली अनावरस मुलगी आहे. प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी वादी यांचे वडिलांशी असलेल्या अवैध संबंधामधून (Illicit Relationsship) प्र.वा.नं.२ मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान ही मुलगी जन्मलेली आहे. वादी भाग्यश्री भरत पाटील व प्र.वा.नं.४ या मयत महावीर आण्णासो पाटील यांच्या कायदेशीर मुलगी असल्याने त्यांना कायदेशीर हिस्सा मिळण्याचा हक्क आहे.

६) मयत महावीर आण्णासो पाटील यांचे नांवे मौजे हुपरी यथील शेत जमीन भूमापन गट क्र.८० व ८३ या मिळकती व ग्रामपंचायत असेसमेंट मिळकत क्र.४४९/१ ही मिळकत व भुमापन क्रमांक ८९४,८९६,९०१,९०३ या मिळकतीचे पत्रकी नावाची नोंदी आहेत.

**ग्रामपंचायत असेसमेंट मिळकत क्र.४४९/१ व भुमापन क्रमांक ८९४,८९६,९०१,९०३ या मिळकती एकच आहेत.**

महावीर आण्णासो पाटील यांचे नांवेअसलेली मौजे हुपरी यथील शेत जमीन भूमापन गट क्र.८० व ८३ या मिळकती व ग्रामपंचायत असेसमेंट मिळकत क्र.४४९/१ या मिळकतीसाठी वादी यांनी मयत महावीर आण्णासो पाटील यांचेकडे मिळणारा कायदेशीर हक्क व हिस्सा तुटक करून सरस निरस मानाने वाटप करणेची मागणी करूनही त्यांनी देणेस साफ नकार दर्शविला. त्यामुळे वादी यांनी इचलकरंजी येथील मे. दिवाणी न्यायालयामध्ये रे.क.नं. ६०/२०१७ हा दिवाणी दावा सरस निरस मानाने वाटणीचा व कायम मनाई ताकिदीचा दावा दाखल केला होता. प्र.वा.नं.१) महावीर आण्णासो पाटील, प्र.वा.नं.२) लक्ष्मी महावीर पाटील, प्र.वा.नं.३)

Superintendent
Civil Court Sr. Dn.

धनश्री उर्फ स्नेहल राहुल हुन्नरगे, प्र.वा.नं.४) सुनिता महावीर पाटील, प्र.वा.नं.५) मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान, प्र.वा.नं.६) संजय आण्णासो पाटील, प्र.वा.नं.७) मंगल सातगोंडा पाटील, प्र.वा.नं.८) श्री पैसा फंड शेतकरी सह.बँक लि. हुपरी यांचे विरुद्ध इचलकरंजी येथील मे. दिवाणी न्यायालयामध्ये रे.क.नं. ६०/२०१७ हा दिवाणी दावा वादी यांनी दाखल केलेला होता.

७) रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दावा कामी मयत महावीर आण्णासो पाटील, प्र.वा. सुनिता महावीर पाटील, प्र.वा. मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान हे सर्वजण दि. ३१/०३/२०१७ या रोजी Advocate B.D.Joshi यांचे तर्फे वकीलपत्र दाखल केलेले होते. तसेच सदर तारखेस कैफियत व म्हणणे देणेस मुदत अर्ज व पत्ता मेमो दाखल केलेले होते. त्यानंतर Adv. B. D. Joshi यांचे तर्फे कैफियत व म्हणणे देणेस पुन्हा मुदत अर्ज दि.८/६/२०१७ रोजी दाखल केलेले होते. त्यानंतर Adv. B. D. Joshi यांचे तर्फे झालेला NO W.S.चा आदेश रद्द करून कैफियत व म्हणणे दाखल करणेचा विनंती अर्ज दि. २६/ ०३/२०१८ या रोजी दाखल केलेले होते.

त्यानंतर ORDER – 1) The no W.S. order passed against defendants no.1,4 and 5 is set aside subject to costs of Rs. 300/-

2) The costs amount be given to plaintiffs. असा आदेश दि.०५/०९/२०१८ या रोजी झालेला आहे. असा आदेश झालेला असताना देखील मयत महावीर आण्णासो पाटील, प्र.वा. सुनिता महावीर पाटील, प्र.वा. मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान हे सर्वजण रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दावा कामी Cost, कैफियत व म्हणणे दिलेले नाहीत. मे. दिवाणी न्यायालयांनी पुरेशी संधी देवूनही मयत महावीर आण्णासो पाटील, प्र.वा. सुनिता महावीर पाटील, प्र.वा. मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान यांनी म्हणणे दिलेले नाही. त्यांचे विरुद्ध NO W.S. म्हणून दि.०९/१०/२०१८ रोजी आदेश झाला. पुढे दावेचे कामकाज चालून वादी यांनी दावा सिद्ध केलेमुळे दावेची जजमेंट व आदेश दि. ३०/०६/२०२२ या रोजी घोषित झालेला आहे. तसेच सदर दावेची हुकूमनामा दि. ३०/०६/२०२२ या रोजी घोषित झालेला आहे. याची सर्व माहिती मयत महावीर आण्णासो पाटील, प्र.वा. सुनिता महावीर पाटील, प्र.वा. मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान यांना माहित होती व आहे.

८) रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दाव्यामध्ये खालील प्रमाणे आदेश घोषित केलेला आहे.

**आदेश**

**(i)** दावा अंशत: खर्चासह निकाली काढला जातो.

**(ii)** या द्वारे असे घोषित केले जाते की, प्रतिवादी नंबर १ – महावीर, प्रतिवादी नंबर ६ - संजय व प्रतिवादी नंबर ७ – मंगल यांचे दावा मिळकतीत १/३ अविभाजित हिस्सा आहे. प्रतिवादी नंबर २ या कायदेशीररित्या विवाहित पत्नी आहेत. मुलगी भाग्यश्री - वादी आणि, मुलगी धनश्री (प्रतिवादी नंबर ३) आणि मुलगी मयुरी (प्रतिवादी नंबर ५) यांना वडिलांच्या

Superintendent
Civil Court Sr. Dn
Ichalkaranji

हिस्सामध्ये समान हिस्सा मिळेल म्हणजेच वडिलांच्या १/३ हिस्सात समान हिस्सा मिळेल म्हणजेच प्रत्येकी १/१५ हिस्सा मिळेल. प्रतिवादी क्रमांक ४ या कोणताही हिस्सा मिळविण्यास पात्र नाहीत.

**(iii)** दाव्यातील मालमत्तेतील तिच्या अविभाज्य १/१५ व्या हिस्सायाचे विभाजन व स्वतंत्र ताबा मिळण्याचा पात्र वादी हक्कदार आहेत.

**(iv)** सरकारला महसूल देण्यासाठी किंवा अशा मिळकतीच्या हिस्साच्या स्वतंत्र ताब्यासाठी मुल्यांकन केलेल्या दाव्याच्या जमिनीचे CPC च्या कलम ५४ नुसार, विभाजन करण्यासाठी आणि संबंधित वाटपधारकांना वाटप करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना डिक्री पाठवावी.

**(v)** प्रतिवादी १,६,७ द्वारे दाव्याच्या जमिनीचा विशिष्ट सीमांकित भाग कोणत्याही प्रकारे वेगळे करणे किंवा हस्तांतरित करणे हे प्रतिबंधित केले आहे, जोपर्यंत दाव्याच्या मिळकततील जमिनीच्या अविभाज्य हिस्साला प्रभावित करतो, जोपर्यंत मोजमापे व सीमांनी विभाजन होत नाही तोपर्यंत त्यांना दाव्याच्या जमिनीच्या बाबतीत तृतीय पक्षाचे हितसंबंध निर्माण करण्यास देखील मनाई आहे.

**(vi)** घराच्या मालमत्तेबाबत, आयुक्त नियुक्त केले जावेत.

**(vii)** त्यानुसार प्राथमिक हुकूम काढावा.
(खुल्या न्यायालयात घोषित केले.)
असा आदेश ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात दि.३०/०६/२०२२ या रोजी घोषित केलेला आहे.

९) या प्रमाणे नमूद इसमांना नमूद हिस्सा ठरवून दिलेला आहे व तसा आदेश हि घोषित झालेला आहे. म्हणजेच रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दाव्यामधील आदेशा प्रमाणे मयत महावीर आण्णासो पाटील यांचे दावा मिळकतीत १/३ अविभाजित हिस्सा आहे. वादी भाग्यश्री भरत पाटील, प्र.वा. धनश्री उर्फ स्नेहल राहुल हुन्नरगे, प्र.वा. मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान या तीन जणांना वडिलांच्या हिस्सामध्ये समान हिस्सा मिळेल म्हणजेच वडिलांच्या १/३ हिस्सात समान हिस्सा मिळेल म्हणजेच प्रत्येकी १/१५ हिस्सा मिळेल. प्र.वा. लक्ष्मी महावीर पाटील या कायदेशीररित्या विवाहित पत्नी आहेत. प्र.वा. सुनिता महावीर पाटील या कोणताही हिस्सा मिळविण्यास पात्र नाहीत. असा आदेश झालेला आहे. वादी या रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दाव्यामधील आदेशा प्रमाणे अंमलबजावणी करणेसाठी इचलकरंजी येथील मे.दिवाणी न्यायालयामध्ये दरखास्त दाखल करणार होते परंतु आर्थिक अडचणी मुळे दरखास्त दाखल करता आले नाही. मुदतीचा कायदा १९६३ (The Limitation Act 1963) नुसार दरखास्त दाखल करणेसाठी मुदत १२ वर्षाची आहे. वादी हे दरखास्त दाखल करणार आहेतच. त्यानंतर महावीर आण्णासो पाटील हे दि. २६/०६/२०२५ या रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे वादी यांनी (१) लक्ष्मी महावीर पाटील, (२) भाग्यश्री भरत पाटील, (३) धनश्री उर्फ

5/1/26
Superintendent
Civil Court Sr. Dn.

स्नेहल राहुल हुन्नरगे, (४) मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान या वारसांची नावांची वारसा प्रतिज्ञापत्र तयार करून वारस नोंदी करणेसाठी आवश्यक कागदपत्रे पूर्तता करून नगर भुमापन क्रमांक ८९४,८९६,९०१,९०३ या मिळकतीवर वारसांची नावांची नोंदी होणेसाठी फेरफार क्र.५७१४ दि.२६/०९/२०२५ या रोजी केलेली नोंद योग्य व बरोबर आहे. फेरफार क्र.५७१४ दि.२६/०९/२०२५ या रोजीचा फेरफार मंजूर होणेस पात्र आहे. प्र.वा. सुनिता महावीर पाटील या कोणताही हिस्सा मिळविण्यास पात्र नाहीत असा आदेश रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दावेतील आदेशात नमूद केलेले आहे. त्यामुळे प्र.वा. सुनिता महावीर पाटील या कायदेशीर वारस नाहीत.

१०) रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दावा मधील जजमेंट व आदेश मयत महावीर आण्णासो पाटील, प्र.वा. सुनिता महावीर पाटील, प्र.वा. मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान यांना मान्य व कबूल असलेमुळे त्यांनी रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दावेतील आदेशा विरुद्ध आजअखेर कोणत्याही दिवाणी न्यायालया मध्ये अपील दाखल केलेले नाही.

११) **हिंदू विवाह कायदा १९५५ (Hindu Marriage Act 1955 ) मधील कलम ५** मध्ये असे नमूद केले आहे कि, विवाहच्या वेळी कोणताही पक्षकार पती किंवा पत्नी जिवंत नसावी.म्हणून जर हि अट पूर्ण झाली नाही तर तर दुसऱ्या पत्नीला पतीच्या मिळकतीत कोणताही हिस्सा मागण्याचा अधिकार नाही. पहिल्या विवाहपासून विवाह विच्छेदन (घटस्फोट) न घेता पुनर्विवाह करणे बेकायदेशीर आहे. म्हणून अशा परिस्थितीत दुसऱ्या पत्नीला पतीच्या मिळकतीत कोणताही हिस्सा मागण्याचा अधिकार नाही.
त्यामुळे प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांना पतीच्या मिळकतीत कोणताही हिस्सा मागण्याचा अधिकार नाही.

१२) **हिंदू विवाह कायदा १९५५ (Hindu Marriage Act 1955 ) मधील कलम १६** नुसार दुसरे विवाहातून जन्मणारे मुल कायदेशीर मुल मानले जाईल. जर वडील मृत्यूपत्र न करता मरण पावले तर त्या मुलांना वर्ग १ चे कायदेशीर वारस म्हणून वडीलांच्या मिळकतीवर अधिकार असेल. मा. सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे कि, बेकायदेशीर मुले त्यांच्या पालकांच्या व वडिलोपार्जित मालमत्तेत सर्व हक्कांचा हक्कदार आहेत.

१३) **हिंदू विवाह कायदा कलम १६ (१)** नुसार बेकायदेशीर मुलांना नैसर्गिक मुलाप्रमाणेच समान हिस्सा मिळण्याचा हक्क आहे. त्यामुळे रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दावा मधील जजमेंट व आदेशनुसार प्र.वा. मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान यांचा हिस्सा घोषित केला आहे.

१४) मयत महावीर आण्णासो पाटील यांची द्वितीय पत्नी प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील या कायदेशीर पत्नी नसलेमुळे त्या कायदेशीर वारस नाहीत. तसेच त्या कोणताही हिस्सा मिळविण्यास पात्र नाहीत असा आदेश रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दावेतील आदेशात नमूद केलेले आहे. प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांना कोणताही हिस्सा कायदेशीरपणे मिळविण्यास कोणताही हक्क नाही तसेच त्या कोणताही हिस्सा कायदेशीरपणे

5/1/26
Superintendent
Civil Court Sr. Dn.

मिळविण्यास पात्र नसलेने त्या हक्कदार हि नाहीत.

असे असताना देखील प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी प्र.वा.नं.३ लक्ष्मी महावीर पाटील, वादी भाग्यश्री भरत पाटील, प्र.वा.नं.४ धनश्री उर्फ स्नेहल राहुल हुन्नरगे यांचा हिस्सा हडप करणेची चुकीचे हेतूने चुकीचे उद्देशपूर्वक बेकायदेशीरपणे, बोगस, बनावट, खोटा, चुकीचा वारसा प्रतिज्ञापत्र तयार करून वारस नोंदी करणेसाठी वापर केलेला आहे. त्यामुळे प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांचे विरुद्ध वादी यांनी हुपरी पोलीस स्टेशनला दि. ३०/१०/२०२५ या रोजी तक्रार अर्ज स्पीड पोस्टाने पाठवलेले आहेत. ठोस कारवाई न झालेमुळे मा. जिल्हा पोलीस अधीक्षकसो कोल्हापूर यांचेकडे दि.१०/११/२०२५ या रोजी तक्रार अर्ज दिलेले असून प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांना शिक्षा व दंड होणेसाठी त्यांचे विरुद्ध इचलकरंजी येथे कि.फौ.अर्ज क्र. ३२७/२०२५ वादी भाग्यश्री भरत पाटील यांनी दाखल केलेले आहेत.

१५) मयत महावीर आण्णासो पाटील यांचे नांवे मौजे हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील नगर भुमापन क्रमांक ८९४,८९६,९०१,९०३ या मिळकतीस वारस नोंद करणेचा कायदेशीर हक्क,अधिकार मयत महावीर आण्णासो पाटील यांचे कायदेशीर वारस प्र.वा.नं.३ लक्ष्मी महावीर पाटील, वादी भाग्यश्री भरत पाटील, प्र.वा.नं.४ धनश्री उर्फ स्नेहल राहुल हुन्नरगे, प्र.वा.नं.२ मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान यांनाच आहे. तसेच प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांना वारस नोंद करणेचा हक्क, अधिकार नाही. तसेच इतर कोणालाही वारस नोंद करणेचा हक्क, अधिकार नाही.

१६) प्र.वा.नं.२ मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान यांना वारसा प्रतिज्ञापत्र तयार करून वारस नोंद करणेचा कायदेशीर हक्क, अधिकार असताना देखील त्यांनी चुकीचे हेतूने चुकीचे उद्देशपूर्वक वारसा प्रतिज्ञापत्र केलेले नाहीत. प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांचा चुकीचे हेतूने चुकीचे उद्देशपूर्वक हक्क निर्माण करणेसाठी प्र.वा.नं.२ मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान यांनी चुकीचे हेतूने चुकीचे उद्देशपूर्वक वारस प्रतिज्ञापत्र केलेले नाहीत. तसेच वारस नोंद करणेसाठी वर्दी अर्ज ही दिलेला नाहीत.

१७) प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी प्र.वा.नं.३ लक्ष्मी महावीर पाटील, वादी भाग्यश्री भरत पाटील, प्र.वा.नं.४ धनश्री उर्फ स्नेहल राहुल हुन्नरगे यांचा हिस्सा हडप करणेचे चुकीचे हेतूने, हक्क निर्माण करणेसाठी, वादी यांना आर्थिक व कौटुंबिक त्रास देणेच्या चुकीचे हेतूने, चुकीचे उद्देशपूर्वक परिरक्षण भूमापक अधिकारी हुपरी यांचे कडे कोणताही कायदेशीर हक्क नसताना देखील बेकायदेशीरपणे, खोटी, चुकीची, बोगस वारस नोंदी करणेसाठी वर्दी अर्ज दिलेला आहे. त्यानुसार हुपरी येथील नगर भुमापन क्रमांक ८९४,८९६,९०१,९०३ या मिळकतीवर फेरफार क्र.५७०७ दि. २४/०९/२०२५ इ रोजी केलेली नोंद रद्द होणेस पात्र आहे.

१८) मयत महावीर आण्णासो पाटील यांचे कायदेशीर व सरळ वारस प्र.वा.नं.३ लक्ष्मी महावीर पाटील, वादी भाग्यश्री भरत पाटील, प्र.वा.नं.४ धनश्री उर्फ स्नेहल राहुल हुन्नरगे हे हिंदू

Superintendent
Civil Court Sr. Dn.
5/1/26

**वारसा कायदा १९५६ (Hindu Succession Act 1956) मधील कलम ८ नुसार वर्ग १ चे** वारस आहेत.

१९) **हिंदू वारसा कायदा १९५६ (Hindu Succession Act 1956) मधील कलम ६** नुसार वादी भाग्यश्री भरत पाटील, प्र.वा.नं.४ धनश्री उर्फ स्नेहल राहुल हुन्नरगे हे समान अधिकार व दायित्वे प्राप्त करणेस हक्कदार आहेत.

२०) **हिंदू विवाह कायदा १९५५ (Hindu Marriage Act 1955 ) मधील कलम ५** नुसार **बहुपत्नीत्वला प्रतिबंधित (Prohibits Polygamy)** असा नमूद कायदा आहे. त्यामुळे मयत महावीर आण्णासो पाटील यांची द्वितीय पत्नी प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील या असलेमुळे त्या पती चे मिळकतीमध्ये कोणताही हिस्सा प्राप्त करणेसाठी त्या पात्र नाहीत.

२१) **हिंदू विवाह कायदा १९५५ (Hindu Marriage Act 1955) मधील कलम १६ व १६ (१)** नुसार प्र.वा. मयुरी उर्फ प्रियांका सुरज भबान यांचा हिस्सा इचलकरंजी येथील मे. दिवाणी न्यायालय मधील रे.क.नं. ६०/२०१७ या दिवाणी दावेतील आदेशात नमूद केलेले आहे.

२२) असे असताना देखील प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्र.वा.नं.२ यांचे लाभात मे. कार्यकारी दंडाधिकारीसो हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचे समोर खोटे, चुकीचे,बनावट , रद्दबातल ,बेकायदेशीर वारसा प्रतिज्ञापत्र केलेले आहेत.

त्यामध्ये माझे पती कै. महावीर आण्णासो पाटील यांचा मृत्यु दिनांक २६.०६.२०२५ इ. रोजी मयत आहेत सदर मयतास सरळ व कायदेशीर वारस खालिलप्रमाणे आहेत.......

| अ. नं. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते | अर्जदाराशी नाते | मयत तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती सुनिता महावीर पाटील | ५७ | पत्नी | स्वत: | हयात |
| २. | सौ.प्रिया सुरज भबान | २९ | मुलगी | मुलगी | हयात |

येणेप्रमाणे सदर मयतास वरीलप्रमाणे सरळ व कायदेशीर वारस अन्य दुसरे कोणीही मुलगा व मुलगी अगर पत्नी असे सरळ वारस नाहीत ही वस्तुस्थिती सत्य प्रतिज्ञेवर खरी व बरोबर आहे.

सदरचे प्रतिज्ञापत्र मयतांचे नांवे असणाऱ्या स्थावर व जंगम मिळकतीस तसेच सिटी सर्व्हे दप्तरी व ग्रामपंचायत दप्तरी व शेतीचे सात बारा व आठ अ पत्रकी आमची नांवे नोंद करणेकामी तसेच इतर शेअर्स तसेच बँका व पतसंस्था व जवाहर व अन्य साखर कारखाने शेअर्स सेवा सोसायटी व ज्ञात अज्ञात इतर ठिकाणी असणारे शेअर्स यांना वारस म्हणून नोंद होणेकामी व जरुरीनुसार आवश्यक त्या शासकीय व निमशासकीय कार्यालयास वारसा हक्क म्हणून सादर करणेकामी केलेले असून सदर प्रतिज्ञापत्रातील माहितीची जबाबदारी ही सर्वस्वी माझी आहे ही वस्तुस्थिती सत्य प्रतिज्ञेवर खरी व बरोबर आहे.

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

मी वर दिलेली सर्व माहिती खरी व बरोबर असून सदर प्रतिज्ञापत्रातील माहिती खोटी व चुकीची आढळलेस भारतीय न्याय संहिता कलम २२९ (२) २३६ व २३७ प्रमाणे होणा-या दंडास व शिक्षेस मी पात्र आहे म्हणून दिले सत्य प्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र असे सही.

या मजकुराचा प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्र.वा. नं.२ यांचे लाभात मे. कार्यकारी दंडाधिकारीसो हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचे समोर केलेले खोटे, चुकीचे,बनावट , रद्दबातल ,बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र केलेले आहे.

२३) प्रस्तुतचे नमूद बेकायदेशीर वारसा प्रतिज्ञापत्र याचा प्र.वा.नं.१ यांनी गैर वापर करून मौजे हुपरी येथील नगर भूमापन क्र. ८९४,८९६,९०१,९०३ या मिळकतीचे मालमत्ता पत्रकी फक्त आपले व प्र.वा.नं.२ यांचे नावे नोंद करणेसाठी फेरफार क्र.५७०७ दि. २४/०९/२०२५ या रोजी नोंद करणेत आली आहे. वादी यांनी फेरफार क्र.५७०७ या विरुद्ध हरकत घेतलेली आहे. त्यानंतर वादी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्रतिवादी नं.२ यांचे लाभात केलेले खोटे, चुकीचे,बनावट , रद्दबातल, बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र याची सही शिक्का यांची प्रमाणित प्रत दि. २७/१०/२०२५ या रोजी प्राप्त केलेली आहे. त्यावेळी प्रथम वादीस प्रस्तुतचे नमूद बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र बाबत माहिती मिळाली. त्या वेळी दावेस कारण घडले व आज अखेर घडत आहे. त्यामुळे वादीचा दावा मुदतीत आहे.

२४) प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्र.वा. नं.२ यांचे लाभात केलेले खोटे, चुकीचे,बनावट , रद्दबातल बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र रद्द करून देणेसाठी वादी यांनी अखेरीस दि.१७/१२/२०२५ रोजी शेवटची विनंती प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांना केली आणि प्रस्तुतचे बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा तबदीलीचा व्यवहार अगर थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करू नये तसेच हरकत, अडथळा करू नये म्हणून विनंती केली. परंतु, प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी वादीची विनंती साफ धुडकावून लावली.

त्यामुळे वादीस प्रस्तुतचा दावा हा “प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्रतिवादी नं.२ यांचे लाभात केलेले खोटे, चुकीचे , ,बनावट रद्दबातल, बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र रद्द होवून मिळावे व असा ठराव व हुकूमनामा व हक्कज्ञापन होवून मिळावे.” तसेच “तथाकथित बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र अनुषंगाने प्रतिवादी यांनी अगर तर्फे इसमांनी कोणताही तबदीलीचा व्यवहार अगर थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करू नये म्हणून कायम ताकीदीची मनाई व्हावी.” करिता प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास भाग पडले आहे.

२५) दाव्यास कारण :- प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्र.वा. नं.२ यांचे लाभात केलेले खोटे, चुकीचे,बनावट , रद्दबातल बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र रद्द करून देणेसाठी वादी यांनी अखेरीस दि.१७ /१२/२०२५ रोजी शेवटची विनंती प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांना केली आणि प्रस्तुतचे बेकायदेशीर

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

असे वारसा प्रतिज्ञापत्र अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा तबदीलीचा व्यवहार अगर थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करू नये तसेच हरकत, अडथळा करू नये म्हणून विनंती केली. परंतु, प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी वादीची विनंती साफ धुडकावून लावली.

त्यामुळे वादीस प्रस्तुतचा दावा हा "प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्र.वा. नं.२ यांचे लाभात केलेले खोटे, चुकीचे , ,बनावट, रद्दबातल, बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र रद्द होवून मिळावे व असा ठराव व हुकूमनामा व हक्कज्ञापन होवून मिळावे." तसेच "तथाकथित बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र अनुषंगाने प्रतिवादी यांनी अगर तर्फे इसमांनी कोणताही तबदीलीचा व्यवहार अगर थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करू नये म्हणून कायम ताकीदीची मनाई व्हावी." करिता प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास भाग पडले आहे.

२६) दाव्याचा तपशील :-

| | | |
|---|---|---|
| रु. | १,०००-०० | दावा हक्कज्ञापनाचा असलेने दाव्याची ठराविक आकारणी रु. १०००/ सदरी दाखल केलेली आहे. |
| रु. | १,०००-०० | दावा कायम मनाईचा असलेने कायम मनाई करिता दाव्याची ठराविक आकारणी रु. १०००/ सदरी दाखल केलेली आहे. |
| **रु.** | **२,०००-००** | **एकूण दाव्याची आकारणी.** |

२७) प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि:०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्र.वा. नं.२ यांचे लाभात केलेले खोटे, चुकीचे,बनावट , रद्दबातल बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र रद्द करणेची मागणी वादी यांनी केलेली आहे. दावा हक्कज्ञापनाचा असलेने हक्कज्ञापनाकरिता दाव्याची ठराविक आकारणी रु. १०००/ व दावा कायम मनाईचा असलेने कायम मनाई करिता दाव्याची ठराविक आकारणी रु. १०००/ आकारणी करून कोर्ट फी व कोर्टाच्या अधिकाराकरिता दाव्याची आकारणी रक्कम रु. २०००/- केली असून त्यावर कोर्ट फी अॅक्ट कलम ६ (४) (जे) नुसार योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प सदरी दाखल केला आहे.

२८) "दावा मिळकत " या मे. कोर्टाच्या स्थलसिमेत आहेत. त्यामुळे या मे.कोर्टास दावा दाखल करून घेणे, चालविणे, न्यायनिर्णय देण्याचा पूर्ण अधिकार आहे.

२९) प्रस्तुतचे वारसा प्रतिज्ञापत्र रद्द करून मिळणेसाठी सदरचा दावा वादीने दाखल केला आहे व तसा ठराव व हुकूमनामा व हक्कज्ञापन होवून मिळावे. वादीने अशा प्रकारची दाद या दाव्या व्यक्तिरिक्त अन्य कोणत्याही कोर्टात दावा किंवा दाद मागितलेली नाही.

३०) प्रस्तुतचे वारसा प्रतिज्ञापत्र रद्द न झालेस वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे तसेच वादी यांचे हक्कावर गदा येणार आहे याउलट प्रस्तुतचे वारसा प्रतिज्ञापत्र रद्दबातल होणेस पात्र असलेले बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र रद्द झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

३१) प्रस्तुतचे खोटे, बेकायदेशीर वारसा प्रतिज्ञापत्र याची माहिती वादीस प्रथम दि.२७/१०/२०२५ या रोजी मिळाली त्यामुळे वादीचा दावा मुदतीत आहे.

३२) सकृत दर्शनी वादी यांची केस स्ट्रॉंग असून न्यायाचा समतोल देखील वादी यांचेच बाजूनेच आहे.

३३) वादी यांना अंतिम यशाची पूर्ण खात्री आहे.

३४) सबब,वादी यांची नम्र विनंती कि,

अ) वादी यांचा दावा कोर्ट खर्चासह मंजूर व्हावा.

आ) प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्र.वा.नं.२ यांचे लाभात केलेले खोटे, चुकीचे,बनावट , रद्दबातल, बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र रद्द होवून मिळावे व तसा ठराव व हुकूमनामा व हक्कज्ञापन होवून मिळावे.

इ) प्रतिवादी यांनी अगर तर्फे इसमांनी प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्र.वा.नं.२ यांचे लाभात केलेले खोटे, चुकीचे,बनावट , रद्दबातल बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र अनुषंगाने दावा मिळकत संदर्भात कोणताही हस्तांतरण, तबदीलीचा व्यवहार अगर थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण करू नये म्हणून कायम मनाईचा आदेश होवून मिळावे.

ई) प्र.वा.नं.१ सुनिता महावीर पाटील यांनी दि.०३/०९/२०२५ या रोजी फक्त आपले व प्र.वा.नं.२ यांचे लाभात केलेले खोटे, चुकीचे,बनावट रद्दबातल बेकायदेशीर असे वारसा प्रतिज्ञापत्र मुलत:च बेकायदेशीर असलेले वारसा प्रतिज्ञापत्र याचा गैर वापर करून प्र.वा.नं.१ यांनी अगर प्रतिवादी नं.२ यांनी आपले नावाची नोंदी दावा मिळकत याचे ७/१२ पत्रकी, असेसमेंट पत्रकी, मालमत्ता पत्रकी करू नये अशी कायम मनाई होवून मिळावे .

उ) जरूर तर दावा दुरुस्तीस परवानगी असावी.

ऊ) दाव्याचा कोर्ट खर्च प्रतिवादी यांचेकडून वादी यांना मिळावा.

ऋ) न्यायाचे अनुषगिक सर्व हुकुम,आदेश,वादीचे वतीने व्हावेत.

येणेप्रमाणे वादीचा दावा असे. वरील सर्व कारणांचा विचार होवूनं वादीचा दावा खर्चासह मंजूर करणेत यावा, ही नम्र विनंती आहे.

दावे सोबत वकीलपत्र, कागद यादी, यादीप्रमाणे कागद, वादीचा पत्ता मेमो, प्र.वादी करिता दाव्याचा व कागद पत्राच्या नक्कला सदरी दाखल केलेले आहे.

येणेप्रमाणे वादीचा दावा असे.

इचलकरंजी

मे. जा.व्हावे.

दि.०५ /०९/२०२६

वादी

BB Patil

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

प्रतिज्ञा

मी वादी भाग्यश्री भरत पाटील, व.व.३६, व्यवसाय- घरकाम, रा.हालोंडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर आज रोजी इचलकरंजी मुक्कामी अशी प्रतिज्ञा करते की, वरील दावा मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा.

दि. ०५ / ०१ /२०२६ सही

B.B.Patil

ॲफिडेव्हीट

मी वादी भाग्यश्री भरत पाटील, व.व.३६, व्यवसाय- घरकाम, रा.हालोंडी,ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर आज रोजी इचलकरंजी मुक्कामी सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट लिहून देते की, सदर दावा मधील लिहिलेला सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून लिहून दिले सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट. सही

दि. ०५ / ०१ /२०२६

B.B.Patil

ॲफिडेव्हीट करणार यास मी ओळखते. MAH/1152/2022

ॲडव्होकेट Adv Bharat Jingonda Patil

प्रतिज्ञा

मी वादी भाग्यश्री भरत पाटील, व.व.३६, व्यवसाय-घरकाम, रा.हालोंडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर आज रोजी इचलकरंजी मुक्कामी अशी प्रतिज्ञा करते की, वरील ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा. सही

दि. ०५ / ०१ /२०२६

B.B.Patil

Solemnly Affirmed before me by
Shri Sau. Bhagyashri Bharat Patil
of Haloudi, Tal. Hatkanangale who is
identified by Shri Adv. B. J. Patil
whom I know personally
Dated: 5-1-2026

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

Issue suit summons to the defendants to appear and answer the claim and to file written statement of their defense, if any within 30 days from the date of service of summons and for settlement of issues and to produce all documents in his possession or power vide Order 8 Rule 1 & 1 (A) of the Code of Civil Procedure.

ARCHANA MANOJ GAIKWAD

Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD
Date: 2026.01.13 16:34:58 +0530

3rd Jt. C.J.J.D., Ichalkaranji.